# महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,

प्रादेशिक कार्यालय, शासकीय तंत्रनिकेतन परिसर, उस्मानपुरा, औरंगाबाद-४३१००५

**(स्वायत्त) (ISO 9001:2015) (ISO/IEC 27001:2013)**

**दूरध्वनी क्रं.** ०२४०-२३४०८९०,२३३४०२५

**Email –** rbteau@msbte.com **Web :** www.msbte.com


जाक्रं.मरातंशिमं/प्राकाऔ/डी-४०/स्टेनो/२०२०/ 405, दिनांक : ११-०६-२०२०

**महत्वाचे परिपत्रक //**

प्रति,
प्राचार्य,
या कार्यालयाशी संलग्नीत सर्व संस्था.

विषय : विहित मुदतीत उन्हाळी परीक्षा २०२० चे परीक्षा अर्ज भरलेले नाहीत अशा विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्याची एक संधी देण्या बाबत चे वेळापत्रक.

संदर्भ : मा.सचिव, म.रा.तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे परिपत्रक क्र.मरातंशिमं/का-४०/उ.प.२०२०/परीक्षा अर्ज/४१, दिनांक १०-०६-२०२०

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, उन्हाळी परीक्षा २०२० करीताचे परीक्षा अर्ज विभागीय कार्यालयामार्फत निश्चित करण्याची अंतिम तारीख २०-०२-२०२० अशी निर्धारित करण्यात आलेली होती. परंतु मंडळाने निर्धारित केलेल्या विहित मुदतीत परीक्षा अर्ज न भरु शकलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्याकरीता एक संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. **परीक्षा अर्ज नियमित शुल्काप्रमाणे आकारणी करुन स्विकारण्यात यावेत.** अवलोकनासाठी संदर्भीय पत्राची प्रत यासोबत देण्यात येत आहे. त्यानुसार सदर पत्रामध्ये नमूद केलेल्या कालावधीप्रमाणे संस्था स्तरावर परीक्षा अर्ज स्विकारण्याचा कालावधी दिनांक ११-०६-२०२० ते १६-०६-२०२० असून सदरील अर्ज या कार्यालयास सादर करण्याचा कालावधीत दिनांक १६-०६-२०२० ते १८-०६-२०२० असा आहे. तरी त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

राज्यामध्ये सध्या कोरोनाची साथ सुरु असल्याने आपल्या संस्थेच्या प्रतिनिधीस या कार्यालयास प्रतिनियुक्त करण्यात येऊ नये. यास्तव परीक्षा शुल्काची रक्कम Dy.Secretary, MSBTE, Aurangabad **Bank Account Number 20093402215, IFSC Code MAHB0000301**, Bank of Maharashtra, Kranti Chowk, Aurangabad या खात्यावर NEFT करुन Bank Reciept UTR Number असलेली पावती व परीक्षा शुल्क भरलेल्या विद्यार्थ्यांची यादी व संस्थेचे हमीपत्र PDF स्वरुपात या कार्यालयास **दिनांक १६-०६-२०२० पासून ते १८-०६-२०२० पर्यंत** rbteau@msbte.com या Email Address वर परिपुर्ण कागदपत्रासह प्रस्ताव या कार्यालयास सादर करण्यात यावा. परिपुर्ण असलेले अर्जच या कार्यालयाकडून Online Confirm करण्यात येतील.

परीक्षा अर्जाचे शुल्काची रक्कम NEFT केल्यानंतरच प्रस्ताव ईमेलद्वारे पाठविण्यात यावा. Email करतांना Subject मध्ये ( Regarding Exam fees Institute Code ....... Summer २०२०) असाच मजकुर नमूद करण्यात यावा, जेणेकरुन प्रस्ताव कोणत्या संस्थेचा आहे हे शोधणे या कार्यालयास सोईचे होईल.

**परीक्षा अर्ज स्विकारण्याबाबत सूचित करण्यात येते की, परीक्षा अर्ज दिनांक १८-०६-२०२० या दिलेल्या मुदतीपर्यंतच स्विकारण्यात येतील. दिनांक १८-०६-२०२० नंतर या कार्यालयाच्या स्तरावर परीक्षा अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची कृपया कार्यालय प्रमुखांनी नोंद घ्यावी.**

सोबत : संदर्भीय पत्राची प्रत.

( डॉ.आनंद नरसिंग पवार, )
उपसचिव,
म.रा.तंत्रशिक्षण मंडळ, प्रा.का.औरंगाबाद

**प्रतिलिपी**

०१ मा.सचिव, म.रा.तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

E:\wagh\D40\D-40\D-40-6.docx